# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक २५/०६/२०२२

# *हॉस्पिटलमध्ये मोबाईल व लॅपटॉप चोरी करणारा चोरटा अखेर जेरबंद*

### ५,२५,०००/- रु. किं. चे एकुण ०७ लॅपटॉप व ३५ मोबाईल जप्त/७ गुन्हे उघड.

(वाकड पोलीस ठाणे तपास पथकाची कारवाई)

--- ०० ---

दिनांक दि.०९/०५/२०२२ रोजी सायं.५.४५ वा. सुमा. मिरा क्लासीक बी/३, संतोष मंगल कार्यालयासमोर, संतोष नगर, थेरगाव पुणे येथील धनश्री डेंटल ॲण्ड इम्प्लांट क्लिनीक मध्ये कोणीतरी अज्ञात चोरटयाने उघडया दरवाजावाटे प्रवेश करुन, फिर्यादी यांचा लॅपटॉप चोरी करुन नेला म्हणुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५३१/२०२२, भादंवि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे. सदर घटनास्थळाचे व परीसरातील सीसीटीव्ही. फुटेज पाहता, एक अनोळखी चोरटा हॉस्पीटलमध्ये चौकशी करण्याचे बहाण्याने आत येऊन हॉस्पीटलमधील स्टाफचे लक्ष नाही हे पाहुन लॅपटॉप चोरी करुन जात असल्याचे दिसून आले. तसेच दिनांक १८/०५/२०२२ रोजी हॅपी क्लिनीकचे बाजूस असणारे, आय.टी.व्हयू. ट्रेनिंग इन्स्टीट्युट, कस्पटे वस्ती रोड, वाकड या ठिकाणी त्याच अनोळखी चोरट्याने लॅपटॉप चोरी केला. त्याबाबत गु.र.नं. ५३३/२०२२, भादंवि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद होता. तसेच दिनांक २५/०५/२०२२ रोजी स्पंदन हॉस्पीटल, डांगे चौक, वाकड येथेही त्याच अनोळखी चोरट्याने मोबाईल फोन चोरी केल्याने वाकड पोलीस ठाणेस गुरनं. ४६३/२२, कलम ३८० भादंवि. अन्वये नोंद होता. तसेच सदर अनोळखी चोरट्याने पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात अनेक हॉस्पीटलमध्ये चोरी केल्याचे केलेल्या तांत्रिक तपासामध्ये निष्पन्न होत होते.

अनोळखी चोरटा हा फक्त हॉस्पीटलमध्येच सराईतपणे अनेक चोऱ्या करत आहे, याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस स्टेशन यांना गुन्ह्याचे योग्य प्रकारे अन्वेषण करुन तात्काळ अनोळखी आरोपीचा शोध घेऊन आरोपी अटक करणेबाबत आदेशित केले. त्याप्रमाणे श्री. सत्यवान माने यांनी त्यांचे अधिनस्थ तपास पथकातील सपोनि. श्री. संतोष पाटील, श्री. संभाजी जाधव व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.

दाखल गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेत असताना घटना घडलेल्या ठिकाणी भेटी देऊन घटनास्थळाच्या आजुबाजूच्या परिसरातील १०० हुन अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. तरीही अनोळखी आरोपीची ओळख पटली नव्हती. आरोपी वापरत असलेला मोबाईल नंबर प्राप्त करण्यासाठी सर्व घटनास्थळावरील तांत्रिक विश्लेषण करण्यात आले परंतु आरोपीबाबत उपयुक्त माहिती प्राप्त होत नव्हती. तसेच आरोपीचा पुर्व इतिहास नसल्याने फक्त चेहऱ्यावरुन आरोपीबाबत माहिती प्राप्त होत नव्हती. सदरचा आरोपी हा हॉस्पीटल, क्लिनीक येथेच चोरी करीत असल्याने पिंपरी चिंचंवड परिसरातील छोट्या मोठ्या हॉस्पीटल यांना जागृत करुन त्यांचे सातत्याने संपर्कात राहुन तसेच लॅपटॉप, मोबाईल विक्री व दुरुस्ती करणाऱ्या दुकानदार यांना अनोळखी इसमाचे वर्णन सांगुन त्यांचेकडे लॅपटॉप, मोबाईल विक्री अथवा दुरुस्ती करण्याकरीता संशयित आल्यास तात्काळ माहिती कळविण्याबाबत सांगितले होते.

दिनांक २१/०६/२०२२ रोजी **सपोफौ. इनामदार** यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अनोळखी आरोपीचे वर्णनाचा मिळता-जुळता एक इसम वाकड रोडवरील एका लॅपटॉप विक्री दुरुस्तीच्या दुकानात लॅपटॉप विक्रीकरीता आला आहे. बातमीचा आशय समजताच तात्काळ वाकड तपास

पथकातील सपोनि. संतोष पाटील व सपोनि. संभाजी जाधव यांनी दोन टिम तयार करुन सापळा लावुन सदर संशयित इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयित इसमाकडे मिळुन आलेला लॅपटॉप हा दाखल गुन्ह्यातील चोरी केलेला असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा त्याचेकडे चौकशी केली असता, त्याचे नाव **विकास संजय हगवणे, वय ३० वर्षे, रा. भुकुम ग्रामपंचायतसमोर, भुकुम, ता. मुळशी जि. पुणे** असे असल्याचे समजले. त्याचेकडे कसुन तपास करता त्याने सदरचे गुन्हे केल्याचे कबुल केले आहेत. त्यास दिनांक २१/०६/२०२२ रोजी २१ः०० वा. अटक करण्यात आली असुन दिनांक २५/०६/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त आहे.

पोलीस कस्टडी दरम्यान आरोपीकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्याने पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात वेगवेगळया हॉस्पिटल व क्लिनीक मध्ये एकुण ०७ लॅपटॉप व ३५ मोबाईल चोरी केल्याची माहिती दिली. आरोपीताकडे अधिक तपास करता, त्याने सांगितले कि, हॉस्पिटल व क्लिनीक मध्ये लोकांची वर्दळ जास्त असते त्यामुळे चोरी करताना व तेथुन निघुन जाताना अडचण येत नसल्याने तो फक्त हॉस्पिटल व क्लिनीक मध्येच चोरी करीत होता. चोरी केल्यानंतर त्याने लॅपटॉप व मोबाईल हे पिंपरी चिंचवड व पुणे शहर परीसरातील वेगवेगळया दुकानात विक्री केल्याचे सांगितले. तसेच आरोपीने विघ्नहर्ता मोबाईल शॉपी, डेक्कन जिमखाना, पुणे या नावाचे बील पुस्तक तयार करुन चोरी केलेले मोबाईल विक्री करताना त्या बिलांचा वापर करुन तोच मोबाईलचा मालक असल्याचे दर्शवुन मोबाईल दुकानदारांना विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने चोरी केलेले **०७ लॅपटॉप व ३५ मोबाईल असा एकुण किंमत रु. ५,२५,०००/-** चा माल जप्त करण्यात आला आहे.

जप्त मुद्देमालाबाबत अटक आरोपीविरुद्ध खालीलप्रमाणे ०७ गुन्हे दाखल असलेबाबत माहिती प्राप्त झाली असुन उर्वरीत मोबाईल व लॅपटॉपबाबत तपास करीत आहोत.

१) वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ५३१/२०२२, भादंवि. कलम ३८०.
२) वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ५३३/२०२२, भादंवि. कलम ३८०.
३) वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ४६३/२०२२, भादंवि. कलम ३८०.
४) पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नं. ४१९/२०२२, भादंवि. कलम ३८०.
५) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. ४६७/२०२२, भादंवि. कलम ३८०.
६) चतुःश्रृंगी पोलीस ठाणे गु.र.नं. २७५/२०२२, भादंवि. कलम ३८०.
७) कोथरुड पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२२, भादंवि. कलम ३८०.

सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. आनंद भोईटे सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले सो. सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पोलीस ठाणे, श्री. रामचंद्र घाडगे, श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. संतोष पाटील, सपोनि. संभाजी जाधव, पोलीस अंमलदार बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, राजेंद्र काळे, वंदु गिरे, दिपक साबळे, अतिश जाधव, प्रमोद कदम, विक्रांत चव्हाण, अतिक शेख, प्रशांत गिलबीले, तात्यासाहेब शिंदे, कौंतेय खराडे, अजय फल्ले व पोउपनि. पवार (परी २ कार्या.) यांनी मिळुन केली आहे.

**(आनंद भोईटे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड